# कौठा दरोडा प्रकरणातील सहा दरोडेखोर पोलिसांच्या ताब्यात



नांदेड, दि. २४ : कंधार तालुक्यातील कौठा येथील एका व्यापाऱ्याच्या घरावर दरोडा टाकून फरार झालेल्या गुन्हेगारांना पकडण्यात नांदेड पोलिसांना यश आले असून आंतरराज्यीय दरोड्याच्या टोळीतील ११ पैकी ६ दरोडेखोरांना गजाआड करण्यात आले तर जवळपास ३४ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. अतिशय किचकट समजल्या जाणाऱ्या दरोड्याच्या गुन्ह्याची उकल करणे पोलिसांसाठी आव्हान ठरले होते. यासाठी एलसीबीच्या वेगवेगळ्या पथकाने गुजरात, राज्यस्थान ■ पान २ वर

### १० दिवसांपूर्वी केली रेकी

घटनेच्या दहा दिवसांपूर्वीच यातील काही आरोपींनी रेकी करुन दरोड्याचा प्लॉन आखला. त्यानुसार कोणा कोणाला बोलावून दरोडा टाकायचा हे ठरविण्यात आले. दरोडा टाकल्यानंतर सर्व आरोपींनी वाटूर फाट्याजवळ थांबून लुटलेल्या मालाची वाटाघाटी केल्याचे सांगण्यात आले. पकडलेले आरोपी : सोनुसिंघ बलविरसिंघ भोंड (वय २२, ऊदजानगर, सुरत), जयसिंघ शेरासिंघ बावरी (२२, दंतेश्वर संतोषवाडी, बडोदा), ■ पान २ वर

## कौठा दरोडा प्रकरणातील सह...

तसेच महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्ह्यात जाऊन गुन्हेगारांसंबंधीची माहिती घेऊन सदर गुन्ह्यातील काही आरोपींना गजाआड करण्यात यश आले. यासाठी दरोड्याच्या वेळी सीसीटीव्हीत आरोपींच्या टिपलेल्या हालचाली आणि अन्य तांत्रिक बाबी याच बरोबर आरोपी संबंधी मिळालेली माहिती महत्वपूर्ण ठरली आहे. कौठा येथील व्यापारी गजानन येरावार यांच्या घरावर दि. १५ जून रोजी अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकून सोने, चांदी, नगदी रुपये असा एकूण ४१ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. येरावार यांचे कौठा येथे कृषी सेवा केंद्र व कापड दुकान आहे. दरम्यान बोलेरो गाडीतून आलेल्या दरोडेखोरांनी कटरने घराचे चॅनल गेट तोडून घरात प्रवेश केला होता. यावेळी कुटुंबियांना शस्त्राचा धाक दाखवून दहशत पसरविली. तर कपाटाच्या चाव्या घेऊन त्यातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम पळविण्यात आली होती. कंधार तालुक्यातील हा सर्वात मोठा दरोडा असल्याने नागरिकांत भितीचे वातावरण पसरल्या गेले.

सदर दरोड्याचा गुन्ह्याच्या शोधासाठी एलसीबीचे वेगवेगळे पथक तयार करुन माहिती घेतली जात होती. दरोडा टाकणाऱ्या गुन्हेगारापैकी काही आरोपी नांदेड व परभणीचे असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून सहा आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपींनी दरोड्याची कबुली देऊन फरार असलेल्या आणखी पाच जणांना सोबत घेऊन दरोडा टाकल्याचे पोलिसांना सांगितले. दरम्यान ताब्यात घेतलेल्या आरोपीकडून ४०५ ग्रॅम सोन्याचे दागिने, ५५ ग्रॅम चांदीचे दागिने, नगदी ८ लाख ५० हजार, गुन्ह्यात वापरलेली कार, मोबाईल असा एकूण ३४ लाख ८८ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. फरार आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल असे सांगण्यात आले. पुढील तपासासाठी आरोपींना कंधार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून आणखी काही गंभीर स्वरुपाचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सदरची कामगिरी श्रीकृष्ण कोकाटे, अपोअ. अविनाश कुमार, अ. पो. अ. डॉ. खंडेराय धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष शेकडे, सपोनि रवी वाहुळे, पोउपनि आनंद बिचेवार, पोउपनि साईनाथ पुयड, पोउपनि मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकानी पार पडली.

### १० दिवसांपूर्वी केली...

अरुण नागोराव गोरे (वय ४५, उस्माननगर, कंधार), शेख खदीर शेख मगदुमसाब (५०, इकबालनगर, धनेगाव), राजसिंघ हिरासिंघ टाक (२२, अण्णाभाऊ साठेनगर, परभणी), गुरुमुखसिंघ हिरासिंघ टाक (२५, नवा मोंढा, जिंतूर रोड परभणी) यातील एक आरोपीवर परभणी येथे उपचार सुरु असून सध्या पाच जण पोलिसांच्या ताब्यात आहेत. फरार आरोपी : सतबीरसिंघ बलवंतसिंघ टाक (अकोला), जसपालसिंघ हरिसिंघ जुन्नी (परतूर), राजपालसिंघ दुधानी (सिंदखेड राजा, जि. बुलढाणा), सददारखान अमीरउल्लाखान (पुसद), मोन्टासिंघ (धुळे).

प्रजावाणी
25/06/2024